# प्रेसनोट

दि.०१/०८/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | नेवासा पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.६६८/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सोपान सदाशिव ढाकणे, वय—३४ वर्ष, बालविकास प्रकल्प अधिकारी, वर्ग—२, पंचायत समिती, नेवासा, ता.नेवासा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/— रुपये तडजोडीअंती ४५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ——— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे चारचाकी वाहन (कार) हे भाडेतत्वावर बालविकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, नेवासा यांचेकडे लावण्यात आले होते. सदर वाहनाचे बील रुपये १,१४,२६१/— हे मंजूर करुन त्याचा चेक तक्रारदार यांचे बॅक खात्यामध्ये जमा करण्यासाठी तक्रारदार यांना दिला, त्या मोबदल्यात आरोपी लोकसेवक सोपान सदाशिव ढाकणे, वय—३४ वर्ष, बालविकास प्रकल्प अधिकारी, वर्ग—२, पंचायत समिती, नेवासा, ता.नेवासा, जि.अहमदनगर याने तक्रारदार यांचेकडे ५०,०००/— रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२३/०६/२०२२ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक ढाकणे याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे ५०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४५,०००/— रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आज दि.०१/०८/२०२२ रोजी आरोपी लोकसेवक सोपान सदाशिव ढाकणे यांचेविरुध्द नेवासा पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी लोकसेवक ढाकणे यांस ताब्यात घेण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in

ई—मेल :— acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :— acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :— १०६४

दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:— ९९३०९९७७००

०१.०८

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर